कला अकादमी गोवा
पणजी–गोवा
कअ/काविवि/रा.म.भ स्प./२०२५–२६/१०४१
दि. ०१/०८/ २०२५

## कृपया प्रसिध्दीसाठी

**कला अकादमीची पुरुष कलाकार राज्यस्तरीय भजन स्पर्धा दि.१५ ऑगस्ट रोजी**

भारताच्या स्वतंत्र दिनाचे औचित्य साधून कला अकादमीतर्फे पं.मनोहरबुवा शिरगांवकर स्मृती पुरुष कलाकारांची राज्यस्तरीय भजन स्पर्धा शुक्रवार दि.१५ ऑगस्ट २०२५ रोजी सकाळी १०.३० वाजल्यापासून कला अकादमीच्या मा. दिनानाथ मंगेशकर कलामंदिरात निश्चित करण्यात आली असून यात विभागीय स्पर्धेतील चार केंद्रावरुन निवडण्यात आलेली एकूण आठ पथके सहभागी होणार आहेत.

राज्यस्तरीय स्पर्धेला जोडून सायं. ६.३० वा. विभागीय व राज्यस्तरीय बाल, महिला व पुरुष कलाकार भजन स्पर्धेचा पारितोषिक वितरण समारंभ होणार असून गोवा राज्याचे सन्मा. मुख्यमंत्री व कला अकादमीचे अध्यक्ष डॉ. प्रमोद सावंत हे या समारंभाला प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहाणार आहेत.

**राज्यस्तरीय भजन स्पर्धेत सहभागी होण्यासाठी पात्र ठरलेली पथके पुढील प्रमाणेः–**

**श्री दाडेश्वर कला केंद्र, नादोडा–बार्देश, दाडेश्वर मुळवीर कला व सांस्कृतिक मंडळ, विर्नोडा–पेडणे, श्री शांतादुर्गा लक्ष्मी नृसिंह सांखळयो भजनी मंडळ, सांखवाळ, ॐ शिव शंभो संगीत विद्यालय, मेरशी–तिसवाडी, श्री विजयादुर्गा भजनी मंडळ, इंफाळ, प्रियोळ–फोंडा, श्री दादामहाराज भजनी मंडळ, बांदोडा–फोंडा, श्री सातेरी केळबाय कला आणि सांस्कृतिक मंडळ, लाडफे–डिचोली व श्री आजोबा कल्चरल असोसिएशन, केरी–सत्तरी**

राज्यस्तरीय स्पर्धेत सहभागी होणा–या आठही पथकानी आपल्या सर्व सहकलाकारासह पुर्वतयारीनिशी १५ ऑगस्ट २०२५ रोजी सकाळी ९.३० वाजता कला अकादमी, पणजी येथे उपस्थित राहाणे आवश्यक आहे. सर्व पथकप्रमुखांच्या उपस्थितीत स्पर्धेतील सादरीकरणाचा अनुक्रम चिठ्ठ्या टाकून ठरविला जाईल व तो सर्वावर बंधकारक राहील. त्यामुळे अंतिम स्पर्धेत सहभागी होणा–या आठही पथकांनी निर्धारित वेळेत उपस्थित राहाणे अनिवार्य आहे.

सदर भजन स्पर्धा सर्वांसाठी खुली असून भजनप्रेमी रसिकांनी स्पर्धेतील सादरीकरण करणाऱ्या कलाकारांना प्रोत्साहन द्यावे तसेच पारितोषिक वितरण समारंभालाही आपली उपस्थिती लावून कला अकादमीला उपकृत करावे असे आवाहन कला अकादमीतर्फे करण्यात आले आहे.

(श्री. प्रदीप गांवकर)
कार्यक्रम व विकास अधिकारी

प्रति
१.गोमंतक २.नवप्रभा ३.तरुण भारत ४.पुढारी ५.लोकमत ६.दै.हेराल्ड ७.गोवन वार्ता,
८. दै भांगरभूंय ९.आकाशवाणी पणजी केंद्र( वृत्तविभाग)